REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १४ पुणें, बुधवार तारीख ११ ऑगस्ट, १९४८ अंक ३२


## दि रत्नाकर बँक, लि.

स्थापना : १९४३

—: शाखा :—

(१) कोल्हापूर, (२) शाहुपुरी, (३) सांगली, (४) मिरज, (५) जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | ... | १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | ६,१७,२०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ३,१३,६०० |
| रिझर्व्ह फंड | ... | २०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ३८,००,००० |

*—अद्यावत बँकिंग व्यवहार केले जातात—*

**नामदार बी. बी. पाटील.**
B. A., LL. B., डेव्हलपमेंट
मिनिस्टर, सांगली स्टेट.
चेअरमन

**श्री. गं. सि. चौगुले.**
M. L. A.
कोल्हापूर
व्हा. चेअरमन

**एल. एन्. शहा.**
B. Com., C. A. I. I. B.
मॅनेजर

## दि सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

( स्थापना सन १९२७ )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ५,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | १,६१,००० रु. |
| भरलेलें भांडवल | ९३,११० रु. चे वर |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,०९,८४० रु. चे वर |
| खेळतें भांडवल | ११,००,००० रु. चे वर |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासदांना, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागिदारांना योग्य तारणावर कर्जें दिलीं जातात. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा व इंडिया इक्विटेबल इं. कं. लि. कलकत्ता, या कंपन्यांचे विम्यांचे हप्ते स्वीकारले जातात. चेक-हुंड्यांची खरेदीविक्री, सरकारी कर्जरोखे व शेअर्स यांची खरेदीविक्री व व्याज वसुली वगैरे

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार**
**या बँकेमार्फत केले जातात.**

बँकेनें नवीन शेअर्स विक्रीस काढले असून शेअर विक्री चालू आहे. प्रत्येक शेअर रु. ५०/– चा असून अर्जासोबत दर शेअरमागे रु. २५/– ( रु. ५/– प्रिमीयम् म्हणून व रु. २०/– अर्जासोबतचे ) रक्कम भरणेची आहे. उरलेली रु. ३०/– ची रक्कम जरूर लागेल त्यावेळीं रु. १०/– चा. एक या प्रमाणें ३ हप्त्यांनीं वसूल करणेंत येईल. दोन हप्त्यांमधील अंतर ३ महिन्याचेपेक्षा कमी असणार नाहीं. शेअर अर्ज व इतर माहिती पाहिजे असल्यास बँकेचे ऑफिसमध्यें मिळेल.

**ना. पां. ठाणेदार**
मॅनेजर

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें







वर्कशॉप मशिनरी (२)
हेवी ड्यूटी
# शिमोगा लेथ
(८′—१०″)
संपूर्ण देशी, पहिल्या प्रतीचा, तज्ज्ञांचे देखरेखीखालीं कुशल कारागिरांनीं अद्यावत् साधनांनीं बनविलेला
— चौकशी स्थान —
केळकर बंधु, बुधवार चौक, पुणें २.

## विविध माहिती

**दिल्लीचें व्यापारी विद्यापीठ**—कमर्शिअल युनिव्हर्सिटी ऑफ दिल्ली ह्या संस्थेतर्फे देण्यांत येणाऱ्या पदव्या आणि दाखले (डिप्लोमा) ह्यांच्या अधिकृतपणाबद्दल हिंदुस्थान सरकारकडे बऱ्याच विचारणा आल्यावरून सरकारनें एक पत्रक काढून असें जाहीर केलें आहे कीं, हें विद्यापीठ कायदेशीर रीत्या स्थापन झालेलें नसल्यामुळें त्याच्या पदव्यांना सरकारची मान्यता नाहीं.

**बडोद्याच्या महाराजांची देणगी**—बडोद्याच्या महाराजांनीं आपल्या वाढदिवसानिमित्त मेहेसाना प्रांत पंचायतीला तीन लाख रुपयांची देणगी दिली आहे. ह्या रकमेचा विनियोग खेड्यांची सुधारणा करण्याकडे व्हावयाचा आहे. पंचायतीनें ह्यापूर्वीच अशा प्रकारचीं ५८ निरनिराळीं कामें करण्याचें ठरविलें होतें. त्यापैकीं ४५ नुकतींच पूर्ण झालीं आहेत.

**प्रश्नावलीचीं उत्तरें देण्याची मुदत**—संयुक्त-महाराष्ट्र परिषदेच्या चिटणीसांनीं भाषावारप्रांत रचना कमिशनच्या अध्यक्षांना तार पाठवून अशी विनंति केली आहे कीं, यासंबंधीं महाराष्ट्रीयांच्यासाठीं जी प्रश्नावली प्रसिद्ध करण्यांत आली आहे, तीमधील प्रश्नांचीं उत्तरें देण्याची मुदत एक महिन्यानें वाढविण्यांत यावी.

**पाकिस्तानसाठी कापड-गिरण्यांचीं यंत्रें**—लाहोरमधील दोन व्यापाऱ्यांनीं पाकिस्तानसाठी कापडाच्या गिरण्याचीं यंत्रें मिळविण्यांत यश मिळविलें आहे असें समजतें. ही यंत्रसामुग्री अमेरिकन असून तिची किंमत सुमारें १५ लाख डॉलर्स आहे. यंत्र-सामुग्री उभारण्यासाठीं वरील व्यापाऱ्यांनीं लाहोर शहर पसंत केलें आहे. गिरणी उभी राहिल्यावर १९४९ च्या अखेरीस २५ हजार चात्या चालवून जाडेंभरडें कापड काढण्यांत येईल असा त्यांचा अंदाज आहे.

**मद्रास सरकारची धांवपळ**—मद्रास प्रांतांतील ज्या भागांत कापडाचा साठा मुबलक आहे, त्या भागांतून १ लाख कापडाच्या गांठी आणून त्यांची कापडाची टंचाई असलेल्या भागांत वाटणी करण्याचा मद्रास सरकारनें हुकूम दिला आहे, असें समजतें. ही कापडाची वाटणी योग्य किंमती घेऊन सहकारी संस्थांमार्फत करण्यांत येणार आहे. ह्या योजनेमुळें निदान एक महिनाभर तरी लोकांच्या तातडीच्या गरजा भागतील असा अंदाज आहे.

**एस्टेट ड्यूटी बिल**—हिंदी पार्लमेंटच्या येत्या अधिवेशनांत एस्टेट ड्यूटी बिल मांडलें जाणार नाहीं असें समजतें. ह्या बिलाचा विचार करणाऱ्या सिलेक्ट कमिटीची बैठक नुकतीच झाली; पण तिनें बिलासंबंधीं विचार केला नाहीं.

**जपानी कापड येणार?**—जपानशीं हिंदनें नुकत्याच केलेल्या कराराप्रमाणें बरेंच जपानी कापड हिंदुस्थानांत येणार आहे असें समजतें. ह्या कापडासाठीं डॉलर्स न लागतां पौंड देण्याचा अधिकार हिंदला रहाणार आहे. हिंदुस्थानांतील कापडाच्या चढलेल्या किंमती खाली आणण्यासाठीं ह्या कापडाचा उपयोग करण्यांत येणार आहे. जपानमध्यें हिंद सरकारनें कांहीं खरेदी केली तर त्याची किंमत पौंडांत देतां यावी म्हणून हिंद सरकार जपानमधील मुख्य सेनापतींशीं गेले कांहीं दिवस वाटाघाटी करीत होतें. जपानमधील लष्करी कारभाऱ्यांना पौंडाची जरूर होती आणि ब्रिटिश कॉमनवेल्थमधील देशांना डॉलर्सची गरज होती; त्यामुळें वरील करार होऊं शकला. जपानच्या लष्करी सरकारला ऑस्ट्रेलियाकडून गहूं आणि लोणी पाहिजे आहे. हिंदुस्थानकडून कोळसा; पाकिस्तानकडून ताग; ब्रह्मदेशाकडून लाकूड; इत्यादि गोष्टींचीही जपानला गरज आहे.

**सिंध तांदूळ देणार**—सिंध प्रांतानें हिंदुस्थानला ६९,१५० टन तांदूळ द्यावयाचें कबूल केलें होतें. त्यापैकीं ६६,२०० टन तांदूळ निर्यात करण्यांत आलाच आहे. सिंधमधून निर्यात करण्यासारखा तांदूळ २,२०,००० टन आहे. त्यापैकीं ३० हजार टनांचीच निर्यात आता व्हावयाची राहिली आहे. सिंधमध्यें गुरांच्या खाण्याच्या जिनसांची फार चणचण आहे. भुईमुगाची पेंड हिंदुस्थानांतून तेथें आयात होणें बंद झालें आहे. गुरांच्यासाठीं आता रेशनकार्डें काढण्यांत आलीं आहेत. २२ हजार रेशनकार्डें घोड्यांसाठीं आणि २० हजार कार्डें गाई-म्हशींसाठी काढण्यांत आलीं आहेत.

**धान्य पिकविण्याची मोहीम**—मध्यप्रांत सरकारच्या प्रसिद्धीखात्यानें अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेला मदत करण्यासाठी एक बोलपट काढण्याचें ठरविलें आहे. ह्या बोलपटासाठीं सुमारें ७० हजार रुपये खर्च होणार असून खर्चांत चार प्रांतिक सरकारांनीं सहभागी होण्याचें ठरविलें आहे. संयुक्त प्रांत सरकार ह्या चारांत आहे. बोलपटाची लांबी ५ हजार फूट होईल. त्यांत पांच मधुर गाणीं आणि दोन जानपद नृत्यें दाखविण्यांत येणार आहेत. बोलपट मुंबईला काढण्यांत येणार असून त्यासाठी मध्य प्रांतांतील निरनिराळ्या भागांतून खेडूत नट निवडण्यांत येणार आहेत.

**हिंदी रेल्वेजची कार्यक्षमता**—हिंदी रेल्वेजच्या कारखान्यांची उत्पादनक्षमता असायला पाहिजे त्यापेक्षा ५० टक्के कमी आहे असें समजतें. कारखान्यांच्या निरनिराळ्या खात्यांत २९ ते ६२ टक्के ह्या दोन टोकांच्या दरम्यान कार्यक्षमता कमी झाली आहे. कारखान्यांतून कामाचे तास आठ असले तरी कामगार कामास प्रारंभ करण्यांत, तें थांबविण्यांत, गप्पा मारण्यांत आणि विडीकाडी ओढण्यांत दोन तास वाया घालवितात. उरलेले सहा तास जरी नीट काम झालें तरी कार्यक्षमता १०० टक्के वाढेल असें म्हणतात. कार्यक्षमता वाढली तर बेकारी माजेल असेंही नाहीं, कारण युद्धापूर्वीच्या मानानें उतारूंची संख्या दुप्पट झाली आहे. सध्या जितक्या गाड्या चालू आहेत त्यांच्या दुप्पट गाड्या सोडल्या तरी त्यांना पुरतील इतकी उतारूंची व मालाची वहातुक आहे. अर्थातच, सर्व कामगारांना पुरेसें काम राहून शिवाय जादा कामगार लागतील, असें एका बड्या रेल्वे अधिकाऱ्याचें मत आहे.

-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
—खादीचें माहेरघर—
# खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ,
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २

# अर्थ

बुधवार, ता. ११ ऑगस्ट १९४८




संस्थापक

प्रो. वा. गो. काळे


संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## स्टर्लिंग कर्ज परतफेडीच्या कराराची एक नाजुक बाजू

स्टर्लिंग कर्जाच्या परतफेडीबद्दल झालेल्या त्रैवार्षिक कराराचें सामान्य विवेचन ता. २१ च्या अंकांत केलें आहेच. त्यानंतर उपलब्ध झालेल्या माहितीवरून, १९५१ जूनपर्यंत २१२ कोटी रु. ची रक्कम आपणाला मिळावयाची असती तरी रक्कम पूर्णपणें मिळण्याबद्दल एक अट घालण्यांत आली आहे असें समजतें. सर स्टॅफोर्ड क्रिप्स ह्यांनीं ९ जुलै रोजीं लिहिलेल्या पत्रांतील तिसऱ्या परिच्छेदांत असे शब्द आहेत कीं, शेवटच्या दोन वर्षांत मिळावयाची रक्कम जर एक नंबरच्या हिशेबांत हिंदुस्थानच्या नांवें ६ कोटी पौंडांपेक्षा जास्त शिल्लक नसेल तरच मिळूं शकेल; व कोणत्याहि एका वेळीं किमान ५० लक्ष पौंड किंवा त्याची पट इतकी रक्कम दिली जाईल. यापैकीं पहिली अट विशेष महत्त्वाची आहे. कारण त्या अटीचा सरळ अर्थ असा होतो कीं, एक जुलै १९४९ पर्यंत हिंदुस्थाननें हातीं असलेल्या व मुक्त होणाऱ्या स्टर्लिंगपैकीं बरीच मोठी रक्कम खर्ची घातली तरच बाकीची रक्कम पुढील दोन वर्षांत मिळूं शकेल. हातीं आलेली रक्कम योग्य कारणांवर खर्च करणें हीच तर गोष्ट आजच्या परिस्थितींत फार कठीण दिसते. कारण, पूर्वींच्या रकमेपैकीं ८ कोटी पौंड अद्याप शिल्लक आहेत व ते शिल्लक असण्याचें कारण यंत्रसामुग्री इंग्लंडकडून मिळूं शकत नाहीं हें आहे. अशा स्थितींत १९४९ जून अखेर मिळणारी बरीच रक्कम यंत्रसामुग्रीच्या खरेदीसाठी आपणाला कशी खर्च करतां येणार? तशी ती खर्चितां आली नाहीं तर चैनीच्या वस्तूंची आयात करून ही रक्क उधळून टाकावयाची कीं काय? खरोखरच अशी अट घालण्यांत सर स्टॅफोर्ड क्रिप्स ह्यांनीं पेचप्रसंग निर्माण केला आहे व आपल्या अर्थमंत्र्यांनीं त्या अटीला कबुली कशी दिली हें समजत नाहीं. इंग्लिश कारखानदारांना आपल्याला यंत्रसामुग्री पुरवितां येत नाहीं हें अगदीं स्पष्ट आहे. याचें एकच उदाहरण हें कीं, अखंड हिंदुस्थानतर्फे कापड गिरण्यांना लागणाऱ्या १८ लक्ष चात्यांची मागणी सध्यां नोंदविलेली आहे. परंतु या मागणींपैकीं १९४८ अखेर इंग्लंड फक्त एक लक्ष, चौतीस हजार चात्या पुरवूं शकेल. अशा बिकट परिस्थितींत हिंदच्या कारखानदारांनीं मागणी केलेली यंत्रसामुग्री इंग्लिश कारखानदार पुरवूं न शकल्यामुळें उपलब्ध होणाऱ्या स्टर्लिंगपैकीं बरीच रक्कम पडून राहाणें अगदीं साहजिक आहे व तसें झाल्यास १९४८ नंतरच्या दोन वर्षांत स्टर्लिंगची बाकीची त्रैवार्षिक करारांतील रक्कम द्यावयास इंग्लंड बांधलेलें नाहीं.

ह्या अडचणींतून मार्ग काढण्याचा पुढील एकच मार्ग दिसतो. यापुढें आपले कारखानदार व हिंद सरकार ह्यांनीं निरनिराळ्या बांधकामांसाठी व उद्योगधंद्यासाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्रीची त्वरित ऑर्डर इंग्लंडला द्यावी, व त्याची माहिती इंग्लंडच्या अर्थखात्याला पुरवावी. म्हणजे आपणाकडून स्टर्लिंगचा विनियोग करण्याच्या बाबतींत दिरंगाई झालेली नाहीं हें स्पष्ट होईल. हिंद सरकारनेंहि आपल्या हाय कमिशनर मार्फत किंवा इतर शक्य त्या मार्गांनीं इंग्लिश कारखानदारांवर यंत्रसामुग्री पुरविण्याबद्दल दडपण आणावें. असें होईल तरच त्या परिस्थितींतून मार्ग निघूं शकेल. विशेषतः मार्च १९४७ पासून नवीन औद्योगिक भांडवल गुंतविण्याच्या बाबतींत हिंदुस्थानांतील परिस्थिति समाधानकारक नाहीं. सरकारनें जाहीर केलेल्या औद्योगिक धोरणाच्या स्पष्टीकरणामुळें आतां वातावरण थोडें निवळत आहे. तरीहि मजुरांचा किती प्रमाणांत वाटा असावा हा नवीन प्रश्न उपस्थित झाला आहे. सरकारनें भांडवलदार वर्गाला विश्वासांत घेऊन उत्तेजन द्यावें व शक्य तितकी यंत्रसामुग्री इंग्लंडकडून मागवावी. विमानें, मोटारी, रेल्वेचीं इंजिनें, कागद व अनेक घरणांचीं बांधकामें यासाठी यंत्रसामुग्री पाहिजेच; त्याचप्रमाणें कापड, साखर, सिमेंट, इ. कारखान्यांतील जीर्ण झालेली यंत्रसामुग्री बदलणें आवश्यक आहे. सारांश, सदर प्रश्नाचा वास्तवतेच्या दृष्टीनें सरकार व कारखानदार ह्यांनीं विचार करावा, व येथील अंतर्गत मतभेद बाजूला ठेवून प्रथम कोणती यंत्रसामुग्री पाहिजे याचा नक्की अंदाज करावा व मागणीची नोंद इंग्लंडकडे करावी. जून १९४९ पर्यंत जर आपण या बाबतींत सावध राहिलों नाहीं, तर कराराप्रमाणें उपलब्ध होणारी स्टर्लिंग कर्जाची रक्कम आपल्या हातीं येणार नाहीं व औद्योगिकरणाची आलेली संधि वांया जाणार आहे. जर यंत्रसामुग्री ऐवजीं चैनीचा माल आयात करावा लागला तर ती गोष्ट तर आर्थिकदृष्ट्या नुकसानीची आहे. तेव्हां या बाबतींत जनतेनेंहि सावध असावें. सरकार व उद्योगपती वास्तवतेचें धोरण आखतील तरच १९५१ जून अखेर कराराप्रमाणें संपूर्ण रक्कम आपल्या हातीं येईल.

## रिझर्व्ह बँकेचें उत्पन्न व खर्च

### तुलनात्मक प्रमुख आंकडे

| | ३०-६-४६ अखेरचें वर्ष (रु.) | ३०-६-४७ अखेरचें वर्ष (रु.) | ३०-६-४८ अखेरचें वर्ष (रु.) |
|---|---|---|---|
| **उत्पन्न** व्याज, डिस्कौंट, एक्सचेंज, कमिशन इ. | १५,५८,०४,९८२ | १०,१२,४३,५११ | १२,७२,९८,१३१ |
| **खर्च** ( प्रमुख बाबी ) | | | |
| नोकर पगार | ९५,७९,०२१ | १,०९,९४,३१६ | १,३३,४६,७३४ |
| चेक, नोटा छपाई | ३२,४८,०९५ | ३८,२६,०५८ | २९,०१,५१७ |
| एजन्सी चार्जेस | २८,१२,४४१ | २८,९१,०८१ | २७,९१,००९ |
| **नफा** | १३,६३,४३,१५० | ८,०२,२७,३०१ | १०,३८,२८,४२८ |
| **नफ्याचा विनियोग** | | | |
| ३½% डिव्हिडंड | १७,५०,००० | १७,५०,००० | १७,५०,००० |
| जादा ½% डिव्हिडंड | २,५०,००० | २,५०,००० | २,५०,००० |
| मध्यवर्ती सरकारकडे वर्ग | १३,४३,४३,१५० | ७,८२,२७,३०१ | १०,१८,२८,४२८ |

को. क्वार्टर्लीचा ताजा अंक

## सहकारी बँकांचें बँकिंग क्षेत्रांतील महत्त्वाचें स्थान

बाँबे कोऑपरेटिव्ह क्वार्टर्लीचा एप्रिल, १९४८ चा अंक नुकताच प्रसिद्ध झाला आहे. त्यांत पहिलीं ७० पानें मुंबई येथें भरलेल्या प्रांतिक सहकारी परिषदेच्या वृत्तांतानें व्यापिलीं आहेत. हिंदी बँकांसंबंधींच्या १९४६ सालाबाबत आकड्यांच्या रिझर्व्ह बँकेच्या ताज्या पुस्तकाची श्री. आर. जी. सरय्या ह्यांनीं सहकारी बँकांच्या दृष्टीनें छाननी करून सुधारणा सुचविल्या आहेत. लहान सहकारी बँका बिगर शेड्यूल्ड बँकांइतक्याच महत्त्वाच्या असल्यानें त्यांचे आकडेहि एकत्रित उपलब्ध करून देणें अगत्याचें आहे. सहकारी बँकांना मोठाल्या रकमा चांगला व्यवहार करण्याच्या दृष्टीनें सरकारी रोख्यांत गुंतवाव्या लागतात, परंतु अशा गुंतवणीचे आकडे दर्शविण्याचें महत्त्व रिझर्व्ह बँकेच्याहि नजरेंतून राहून गेलेलें दिसतें! शेड्यूल्ड व बिगर–शेड्यूल्ड बँकांच्याइतकीच विस्तारानें सहकारी बँकांचीहि माहिती द्यावी, असें श्री. सरय्या ह्यांनीं प्रतिपादलें आहे. सहकारी बँकांचें हिंदी बँकिंग क्षेत्रांतील महत्त्व दर्शविणारे आकडे श्री. सरय्या ह्यांनीं दिले आहेत, ते खालीं उद्धृत केले आहेत. लहान सहकारी बँकांचे आकडे आधीं सांगितल्याप्रमाणें अर्थातच त्यांत आलेले नाहींत.

**सर्वांगीण सहकारी जीवनाची आवश्यकता**

मि. हेन्रिक एफ. इनफील्ड ह्यांचें पॅलेस्टाइनमधील सहकारी जीवनावरील पुस्तक सुप्रसिद्धच आहे. जगांतील वेगवेगळ्या देशांतील सहकारी वसाहतींचे व शेतीचे प्रारंभींचे प्रयत्न वर्णन करणाऱ्या मि. इनफील्ड ह्यांच्या पुस्तकाचा ("को–ऑपरेटिव्ह कम्युनिटीज ॲट वर्क") अर्थमंत्री श्री. वैकुंठराय मेहता ह्यांनीं परामर्श घेतला आहे. पुष्कळसे हे सहकारी प्रयत्न का अयशस्वी झाले, ह्याची चर्चा उद्बोधक आहे. "केवळ सहकारी शेतीनें भागणार नाहीं, तर आपलें सबंध जीवनच सहकारी पाहिजे; उत्पादनांतच केवळ सहकार्य केलें, तर फुटीर वृत्तीस वाव मिळतो. आर्थिक यशाचा परिणाम विस्कळितपणांत होणें टाळावयाचें असल्यास सर्वांगीण सहकारी जीवनाचें ध्येय कायम समोर ठेवलें पाहिजे."

| | शेड्यूल्ड बँका (एक्सचेंज बँका वगळून व इंपीरिअल बँक धरून) | | बिगर शेड्यूल्ड बँका | | एक लक्ष रुपयांवरील भांडवल अधिक रिझर्व्ह असणाऱ्या सहकारी बँका | |
|---|---|---|---|---|---|---|
| | आकडे | | लक्ष रुपयांचे | | आहेत. | |
| | १९३८ | १९४६ | १९३८ | १९४६ | १९३८ | १९४६ |
| भांडवल व रिझर्व्ह | २३,११ | ५५,५७ | ३,७४ | १३,५५ | १०,०० | १४,३० |
| ठेवी | १७३,२९ | ८९५,९० | १४,८४ | १२२,४१ | ३५,२३ | ७१,३७ |
| कर्जें | ८५,९९ | ४०१,३१ | १२,१६ | ६८,११ | २९,०० | ३५,२६ |
| रोख व बँकांत शिलक | २२,४४ | १६३,२१ | १,८१ | ३३,९३ | २,१३ | ७,३८ |

## दि सुप्रीम म्युच्युअल अशुअरन्स कंपनी लि., पुणें.

**सर्वांगीण प्रतिकूल परिस्थितींतहि कामाची प्रगति**

गेले सबंध वर्षभर हिंदुस्थानांत ज्या बऱ्याच दुर्दैवी घटना घडून आल्या त्यामुळें इतर सर्व धंद्यांबरोबर विमाव्यवसायावरही बराच व दूरगामी असा प्रतिकूल परिणाम झाला आहे. त्याकारणानें हिंदुस्थानांतील कित्येक चांगल्या नांवाजलेल्या विमा कंपन्यासुद्धां प्रगति करूं शकल्या नाहींत, हें त्यांच्या १९४७ अखेरच्या अहवालावरून दिसून येतें. अशा प्रतिकूल परिस्थितींतसुद्धां पुणें येथील दि सुप्रीम म्युच्युअल विमा कंपनीनें तिचे परंपरेस अनुसरून गतवर्षीपेक्षां जवळजवळ एक लाखाचें जास्त काम पूर्ण केलें, ही गोष्ट तिचे चालकवर्गास खरोखरच भूषणावह आहे. कंपनीनें १९४७ सालीं २४,६६,७५० रु. चे वर काम पूर्ण केलें असून चालू हप्त्यांचें उत्पन्न २,३१,१७६, रु. आहे. कंपनीचा आयुर्विमानिधी ३,५९,६४६ रु. वर गेला असून रिन्युअलवरील खर्चाचें प्रमाण फक्त १४·९ टक्के आहे. कंपनीचे मालमत्तेपैकीं बराचसा भाग कमी व्याजाचे दरानें सरकारी कर्जरोख्यांत कायद्याप्रमाणें गुंतवावा लागत असूनसुद्धां तिनें कर्जरोख्यावरील व इतर दिलेल्या कर्जावर व्याजाचें व इतर असें ९,८३६ रु. उत्पन्न मिळविलें आहे. कंपनीचे अध्यक्ष, श्री. एस. पी. आठवले, ह्यांनीं कंपनीच्या वार्षिक सभेंतील आपल्या भाषणांत विमा कंपन्यांच्या पुढील प्रश्नांचें विवेचन केलें आहे. सुप्रीम म्युच्युअलचे कर्णधार श्री. व्ही. एन. म्हैसूर, एम. ए., एलएल. बी, ह्यांनीं कंपनीस आजचें स्थान प्राप्त करून दिलें आहे आणि त्यांच्या व्यवस्थेखालीं कंपनीची आणखी भरभराट होईल अशी अपेक्षा आहे. कंपनीची वार्षिक सभा ता. २४ जुलै रोजीं झाली.

## दि सांगली बँक लि.

**मुंबई येथें रिझर्व्ह बँकेशेजारी नवी इमारत**

वरील बँकेस ३१ डिसेंबर, १९४७ अखेर संपलेल्या वर्षी १,१४,९८७ रु. नफा झाला.म्हणजे, १९४६ सालांतील नफ्यापेक्षां सुमारें १५ हजार रुपये नफा जास्त झाला आहे.सुमारें ९३ लक्ष रु. खेळत्या भांडवलावरील हा नफा आहे, ह्यावरून बँकेच्या किफायतशीर व्यवहाराची कल्पना येईल. नफ्यांतून ३८,९०० रु. रिझर्व्ह फंडांत वर्ग केल्यावर तो फंड आतां ३,३९,००० रुपयांवर गेला आहे. कायद्याप्रमाणें जेवढी रकम घालणें जरूर आहे, त्यापेक्षां फार मोठी रक्कम रिझर्व्ह फंडांत वर्ग करण्यांत आली आहे. भागीदारांना ७% डिव्हिडंड + ५% बोनस (दोन्ही करमाफ) मिळालें आहे. अहवालाचे सालांतील महत्त्वाची गोष्ट म्हणजे बँकेसाठीं खरेदी करण्यांत आलेली मुंबई येथील इमारत, ही होय. ही इमारत रिझर्व्ह बँकेनजीक असून सर्व दृष्टीनें सोईची आहे. बँकेच्या उपयोगासाठीं इमारतीचा एक मजला ताब्यांतहि मिळाला आहे बँकेच्या आतां ११ शाखा चालू आहेत व तिचें व्यवहारक्षेत्र वाढलें आहे. श्री. पी. एस. मोकाशी. बी. ए. हे बँकेचे कित्येक वर्षे मॅनेजर असून त्यांच्या व्यवस्थेखालीं बँकेची भरभराट झाली आहे.

**बहुमोल ग्रंथांचें भाषांतर**—संयुक्त राष्ट्रसंघाच्या शिक्षण व संस्कृति संघटनेची बैठक पॅरिस येथें भरली होती. जगांतील लोकांची एकमेकांना अधिक चांगली माहिती व्हावी म्हणून निरनिराळ्या भाषांतील बहुमोल ग्रंथांचीं भाषांतरें करण्याची शिफारस संघटनेनें केली आहे. ही सूचना ११ राष्ट्रांच्या तज्ज्ञांनीं आपल्या बैठकींत मंजूर केलेली आहे.

## कापडावर पुनः नियंत्रण

सरकारनें १९ जानेवारी १९४८ पासून कापडावरचें नियंत्रण काढून टाकल्यावर कापडाच्या किंमती भरमसाट वाढल्या आणि २४ एप्रिल रोजीं किंमतीच्या शिक्क्यासंबंधीं नियंत्रण उठवल्यानंतर ह्या किंमती आकाशाला जाऊन भिडल्या. जूनच्या मध्यास घाऊक कापडाच्या किंमती थोड्या उतरल्या, परंतु किरकोळ किंमती मात्र उतरण्याचीं चिन्हें अजून दिसत नाहींत.

तेव्हां सरकारनें खालील उपाय योजण्याचें ठरविलें आहे:—

( १ ) गिरण्यांची उत्पादन शक्ति पूर्ण उपयोगांत येते किंवा नाहीं हें सरकार पाहील. उत्पादनांतील घट थांबविण्यासाठीं सरकार एक योजना आंखील. त्याचप्रमाणें अयोग्य आणि न टिकणारें अशा कापडाचें उत्पादन होणार नाहीं यासंबधीं सरकार दक्ष राहील.

( २ ) कापडाची किंमत सरकार ठरवील. ही किंमत टॅरीफ बोर्डानें ठरविलेल्या किंमतीप्रमाणें असेल.

( ३ ) सर्व कापडावर ही किंमत छापलेली असेल.

( ४ ) प्रांतिक सरकारनें व संस्थानी सरकारनें मान्यता दिलेल्या घाऊक व्यापाऱ्यांनाच कापडाचा कोटा देण्यांत येईल.

( ५ ) सध्यां घाऊक व्यापाऱ्यांकडे जे शिक्के मारल्या शिवाय कापड शिल्लक आहे त्याची विक्री ता. १ ऑक्टोबरपर्यंतच करतां येईल.

( ६ ) मध्यवर्ती, प्रांतिक आणि संस्थानी सरकारांना त्यांना योग्य वाटेल त्या किंमतीला या तारखेनंतर घाऊक व किरकोळ व्यापाऱ्यांकडून कापड जप्त करण्याचे अधिकार रहातील.

( ७ ) कच्च्या कापसाचे भावावर नियंत्रण घालण्याच्या प्रश्नाचा हिंदुस्थान सरकार तावडतोब विचार करील.

( ८ ) कांहीं टक्के कापड सरकारी दुकानांतून विकण्याची व बाकीचें कापड सहकारी ग्राहक संस्थांच्या दुकानांतून व इतर दुसऱ्या व्यापारी मार्गांनीं विकण्याची तरतूद या नवीन धोरणांत आहे.

( ९ ) या नवीन धोरणाची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठीं एक नवीन खातें उघडण्यांत येणार आहेत.

( १० ) ही योजना सर्वांगीण करण्यासाठीं तिच्यावर आणखी विचार करण्यांत येत आहे व संपूर्ण योजना पुढील कांहीं आठवड्यांत जाहीर करण्यांत येईल.

---

### घरमालक भाडें नाकारूं शकत नाहीं.

भाडेकरूंना छळण्यासाठीं कित्येक घरमालक ठरलेलें मासिक भाडें घेण्याचें नाकारतात. परंतु, त्यामुळें भाडेकरूंनीं भिण्याचें कारण नाहीं. त्यांना घरांतून घालवून देण्याचा अधिकार घरमालकास प्राप्त होण्यापूर्वी त्यानें भाडेकरूला एका महिन्याची नोटीस देणें कायद्यानें आवश्यक असतें. भाडेकरू आपलें भाडें कोर्टांतहि भरूं शकतात. तेव्हां घरमालकाला भिऊन, बेकायदा त्याची मूठ दाबण्याचें भाडेकरूंना कारण नाहीं.

---

**पंजाबच्या फाळणीचा इतिहास**—पंजाबच्या फाळणीसंबंधींचा एक विस्तृत इतिहास दोन हायकोर्ट जज्ज एका इतिहासकाराच्या सल्लामसलतीनें लिहिणार आहेत. हिंदच्या मदत आणि पुनर्वसाहत खात्यानें जमा केलेल्या विश्वसनीय माहितीवर हा इतिहास आधारण्यांत येणार आहे. खात्याची माहिती जमा करणारी संघटना पूर्व व पश्चिम पंजाबमधील माहिती जमा करीत आहे. ह्या माहितींत, पंजाबमध्यें घडलेल्या दुःखकारक घटना ज्यांनीं प्रत्यक्ष पाहिल्या आहेत त्यांनीं दिलेली माहितीही समाविष्ट करण्यांत येणार आहे.


## दि डेक्कन पॉटरीज ॲण्ड अलाइड इंडस्ट्रीज, लि.

**रजिस्टर्ड ऑफिसः—१९६।२९, सदाशिव पेठ, पुणें २**

कारखाना:—चिंचवड ( जी. आय्. पी. रेल्वे ) पुणें शहराजीक. तारेचा पत्ता:—'पॉटर्स', पूना.

**चेअरमन—रावबहादुर गणेश गोपाळ शेंबेकर, जमीनदार, बारामती.**

★ कंपनी कपबशा, बरण्या, फायर ब्रिक्स, कौलें वगैरे नित्योपयोगी माल तयार करण्याकरितां स्थापन झाली आहे.


★ कंपनीच्या जागेंत कारखान्याची इमारत, भट्टी, चिमणी व गोडाऊन बांधून पुरें झालें आहे.

★ कच्चा माल कारखान्यांत आलेला असून मशिनरी बसविण्याचें काम सुरू आहे.

**मेसर्स नॅशनल ट्रेडिंग कंपनी, पुणें २.**

**मॅनेजिंग एजन्टस्.**

शेअर्स वगैरे माहितीकरितां कंपनीच्या रजिस्टर्ड ऑफिसशीं पत्रव्यवहार करावा.



**अधिक धान्य पिकविण्याची योजना**

**—यशस्वी होण्यास—**

## किर्लोस्कर पंपिंग सेट्स

**हें अमोघ साधन आहे.**

त्याचें सहाय घ्या !

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी

## हिंदी पार्लमेंटांतील आगामी बिलें

कांहीं विशिष्ट पारिस्थितींत कारखाने आपल्या ताब्यांत घेण्याचे अधिकार स्वतःकडे घेण्याचा विचार हिंद सरकार करीत आहे असें समजतें. मजूर मालक भांडणांत जे कारखाने लवादाचे निकाल अंमलांत आणगार नाहींत त्याच कारखान्यांसंबंधीं मुख्यतः असा विचार चालू आहे. हिंदी पार्लमेंटच्या ऑगस्टच्या अधिवेशनांत ह्याविषयींचें बिल सरकारतर्फे पुढें मांडण्यांत येईल. ह्या शिवाय, कारखान्यावर नियंत्रण ठेवण्या विषयींचें व त्यांना परवाना देण्यासंबंधींचेंही एक बिल मांडलें जाईल. ज्या कापडा बाबत कांहीं गुन्हा करण्यांत आलेला आहे असें कापड जप्त करण्याचा अधिकार देणारेंही एक बिल मांडलें जाईल. ह्या बिलाचा उद्देश कापडाचा काळा-बाजार व चोरटी वहातूक, ह्यांना आळा घालण्याचा आहे. हिंदी उद्योगधंद्यांतील परकीय भांडवलावर नियंत्रण घालणारेंही एक बिल सरकार विचारांत घेत आहे. देशांतील खनिज संपत्तीचा योग्य उपयोग करण्यांत यावा म्हणून खाणी-संबंधींही एक बिल मांडलें जाईल. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिआच्या कायद्यांत दुरुस्ती करणारें बिल आणून ती बँक सरकारची करण्याचेंही घाटत आहे. ह्या संबंधींच्या बिलान्वयें बँकेचें भांडवल सरकारकडे वर्ग करण्यांत येईल.

ब्रिटिश आणि अमेरिकन गुन्हेगारांची चाकशी करण्याबाबत जे विशेष हक्क ह्या आरोपींना आहेत ते काढून घेणारें बिल-ही ह्याच अधिवेशनांत मांडलें जाईल. १९५१ सालीं शिरगणती होणार आहे; तेव्हां त्यासंबंधीं शिरगणती करणाऱ्या अधिकाऱ्यांना योग्य ते अधिकार देणारें बिलही मांडलें जाईल. हिंदी चित्रपटांचा कायदाही दुरुस्त करण्यांत येणार आहे. बोलपटांची तपासणी व छाटाछाट करण्यासंबंधीं सर्वसामान्य धोरण सरकार घालून देणार आहे. लहान मुलांना व वयांत येऊं लागलेल्या स्त्री पुरुषांना पहाण्यास अयोग्य असे चित्रपट फक्त विवक्षित वयापुढील नागरिकांनीं पहावे, अशा तऱ्हेचा निर्बंध घातला जाईल असें वाटतें. घरें बांधण्याच्या योजनेला द्रव्यद्वारा मदत करण्यसाठी एक हौसिंग बिल मांडण्यांत येणार आहे. ह्या बिलान्वयें एका बोर्डाची ह्या कामासाठीं निर्मिती होईल. मध्यवर्ती सरकारच्या मंत्र्यांना रहाण्याचीं घरें मोफत दिलेलीं असलीं तर त्यांची प्राप्तीवरील करांतून मुक्तता करावी कीं नाहीं हा मुद्दा संदिग्ध राहिलेला आहे. मध्यवर्ती मंत्र्यांच्या पगारावर आकारण्यांत येणाऱ्या प्राप्तीच्या करांतून घरें सोडून देण्यासंबंधीचें बिल मांडण्यांत येणार आहे. हिंदी लष्करांतील ज्या अधिकाऱ्यांना किंग्ज कमिशन मिळालेलें आहे त्यांना ब्रिटिश आर्मी ॲक्ट आतांपर्यंत लागत असे. पण ह्यापुढें त्यांना इंडियन आर्मी ॲक्टच्या कक्षेंत आणण्यासाठीं संरक्षण-मंत्री एक बिल आणणार आहेत.

**ग्रीसच्या अंदाजपत्रकांत हस्तक्षेप**—ग्रीसच्या अंदाजपत्रकांत तेथील अमेरिकन अधिकारी हस्तक्षेप करीत असल्याची वार्ता आहे. मार्शल योजनेप्रमाणें ज्या बाबींवर खर्च करण्याची ग्रीसच्या सरकारला मुभा आहे, त्याव्यतिरिक्त इतर बाबींवर अमेरिकन डॉलर्स खर्च होता कामा नयेत अशी सूचना ग्रीसमधील अमेरिकन वकील डॉ. ग्रॅडी ह्यांनीं ग्रीसच्या पंतप्रधानांना दिली आहे असें समजतें. ह्या बाबतींत ग्रीसच्या प्रधान मंडळानें डॉ. ग्रॅडींशीं चर्चा केली; पण तिचा कांहीं उपयोग झाला नाहीं असें म्हणतात.

—महाराष्ट्रांतील—
प्रगमनशील व अग्रेसर विमा संस्था
दि औंध म्युच्युअल इन्शूरन्स सोसायटी लि. पुणें २
—आमचीं वैशिष्टयें—
( १ ) काटकसरीचा कारभार ( २ ) खर्चाचें अल्प प्रमाण ( ३ ) क्लेम्स ताबडतोब पटविणें ( ४ ) एजंटास कायमचें व वंशपरंपरागत कमिशन ( ५ ) माफक हप्त्याचे दर.
विमा अथवा एजन्सी यासाठी लिहा अगर भेटा.
—मॅनेजिंग डायरेक्टर









## ठेवीदारांच्या हिताच्या दृष्टीनें बँकांचें नियंत्रण

( २ )

लेखकः—श्री. ल. म. जोशी, बी. कॉम.,
सर्टि. ए. आय. बी. (लंडन), सर्टि. ए. आय. आय. बी. (मुंबई)

### "होयबा" डायरेक्टर

एका बँकेंत असलेला डायरेक्टर दुसऱ्या बँकेंत पुन्हा डायरेक्टर म्हणून काम करूं शकणार नाहीं. केवळ पैशाचें पुरेसें पाठबळ नसल्यामुळें किती तरी कर्तबगार लोकांना आपल्या कर्तृत्वशक्तीस वाव देऊन संस्थेची व पर्यायानें देशाची सेवा करण्याचें द्वार बंद झालें होतें, तें या कलमानुसार खुलें होईलसें वाटतें. त्याचप्रमाणें कलमामध्यें असेंही पोटकलम हवे होते कीं ज्यांत बँकेचा डायरेक्टर होण्याची लायकी त्याच्या त्या क्षेत्रांतील विशिष्ट अनुभवावरून व शिक्षणावरून मर्यादित केलेली असावी; यामुळें खुर्च्या सुशोभित करण्याकरतां बसलेले व सभेंत होणाऱ्या चर्चेतील पुष्कळसा भाग न समजतांच "हो" ला "हो" म्हणणारे "होय बा" बऱ्याच जागा खाली करतील आणि त्या जागा कर्तबगार लोकांस वाव मिळेल. याचा परिणाम बँकांच्या व्यवस्थेवर चांगल्या तऱ्हेनें झाल्याशिवाय खचित् रहाणार नाहीं.

हल्ली हल्लीपर्यंतचा तरी अनुभव असा आहे कीं एखादी मोठी बँक बुडत आहे हें माहीत असून व वेळींच तिला रिझर्व्ह बँकेची मदत मिळाली असती तर ती पुन्हा चांगल्या रीतीनें चालून पुष्कळ लोकांचें हित साधलें असतें याची जाणीव असूनही रिझर्व्ह बँक या नाहीं त्या कारणानें तिला मदत करूं शकली नाहीं व त्यामुळें ती बँक बुडून फार लोकांचें त्यांत नुकसान झालें आहे.

### तपासणी

सरकारनें सांगितलें म्हणून तपासणी करणें किंवा एखाद्या बँकेनें शिड्यूल्ड बँक होण्याकरितां अर्ज केल्यानंतर तें तंत्र म्हणून रिझर्व्ह बँकेनें बँकेची तपासणी करणें हें कोणीही बँक तिला असे अधिकार दिल्यावर करूं शकेल यांत मोठेसें काय आहे? जर रिझर्व्ह बँकेला दर महिन्याला सर्व बँकांकडून निरनिराळ्या माहितीनें भरलेलीं स्टेटमेंटस येत असतात तर तीं नुसतीं फाईल करण्याकरितां येतात तसतशी तपासून, आपल्या विशिष्ट तंत्रांत बसतांहेत किंवा नाहीं हें बघणें व नसल्यास ताबडतोब त्या बँकेस बजावणें हें रिझर्व्ह बँकचें प्रमुख कर्तव्य ठरत नाहीं काय? तिला अशा तऱ्हेनें वेळींच सावध केल्यास किती तरी अनर्थ वाचेल. पण खूप घोटाळा माजल्यानंतर मग तपासणीची धांवाधांव सुरू करावयाची व लोकांमध्यें साहजिकच घबराट निर्माण झाल्यावर त्या बँकेस ठेवी घेण्यास बंदी करावयाची ही पद्धत बरोबर नाहीं. अशा तऱ्हेनें विशिष्ट बँकांची तपासणी करण्यापेक्षां सर्वच बँकांची—मग ती लहान असो अगर मोठी असो—केव्हांही एकदम, आगाऊ नोटीस न देतां, मधून मधून तपासणी करण्याची प्रथा रिझर्व्ह बँकेनें ठेवावी. म्हणजे लोकांमध्यें उगीच संशय उत्पन्न होणार नाहीं, बँकेची तपासणी केव्हां येईल याचा नेम नसल्याकारणें प्रत्येक बँक आपल्या कामांत जागरूक राहील, व सर्वांचें सहकार्य या कामांत रिझर्व्ह बँकेला मिळाल्यास व तिनेंही इतर बँकांकडे आपुलकीच्याच भावनेनें बघून वेळोवेळीं योग्य सूचना केल्यास, सर्वांचेंच हित यांत साधूं शकेल.

इतकें करून दुर्दैवानें एखादी बँक बुडाली तर तिथल्या ठेवीदाराचे पैसे शक्य तितक्या लवकर मिळावेत या दृष्टीनेंही रिझर्व्ह बँकेला कांहीं अधिकार देण्यांत आले आहेत. उदाहरणार्थ ठेवीदारांच्या खात्याप्रमाणें ठेवी मान्य करणें, देणेंदारांच्या सभांना शक्य असल्यास कांट देणें वगैरे गोष्टी करून झटपट निकाल लावून लोकांचे पैसे शक्य तितक्या लवकर परत करण्याची व्यवस्था करणें सुलभ होणार आहे. यामध्येंही कांहीं लोकांची सूचना अशी आहे कीं, हें खातें रिझर्व्ह बँकेकडे सोपविण्यापेक्षां जर दी कन्स्ट्रक्शन फिनॅन्स बोर्ड, यु. एस. ए. सारख्या एखाद्या स्वतंत्र बोर्डाकडे दिलें गेलें असतें तर कार्यक्षमतेच्या दृष्टीनें योग्य झालें असतें.

### चालू ठेवींस उत्तेजन

कांहीं कांहीं बाबतींत या बिलानें कठोरपणा धारण केल्यासारखा आपल्याला आढळेल. कांहीं ठिकाणीं त्याची दुर्बलताहीं आपल्याला आढळून येईल तर कांहीं बाबतींत त्या बिलामध्यें अभाव आहे असें आपल्या निदर्शनास येईल. उदाहरणच द्यावयाचें तर असें म्हणतां येईल कीं, सध्याच्या पद्धतीमध्यें मोठ्या व्याजाच्या दरानें ठेवी घेऊन त्याच्याही पेक्षां वरच्या दरानें (म्हणजे ४ ते ५ टक्के व्याजानें ठेवी घेऊन ६ ते ७ टक्के व्याजानें) त्या कर्जाऊ रकमांत गुंतविणें ही जी हल्लीची प्रथा पुष्कळ बँकांत दृष्टीस पडते ती सुधारणा करणारें कलम या बिलांत कुठेंच नाहीं. चालूं खात्यावर किंवा सेव्हिंग्स खात्यावर अनुक्रमें १-१½ टका व २-२½ टक्के ही कांहीं बँका देतात तर कायम ठेवींवर ५ वर्षेपर्यंत ४ ते ५ टक्के व्याज देतात. कर्जे त्याच प्रमाणांत मोठ्या दरानें म्हणजे ६–७ टक्क्यानें दिली जातात. यामुळें व्यापार करणाऱ्यांसही किंमती जास्त ठेवून माल विकावा लागत असल्यामुळें सरते शेवटीं माल घेणाऱ्यासच जास्त भावांत माल घेऊन तें सहन करावें लागतें. अशा तऱ्हेनें व्यापाराचा फायदा होत नाहीं. पुष्कळ बँकांचे बॅलन्स शीटस पाहिलें तर या वरच्या दरानें घेतलेल्या ठेवी व चालूं खात्याच्या ठेवी यांचें प्रमाण समसमान अगर बेळेला जास्तीच असते. या पेक्षां चालूं खात्यावर ठेवी जास्त प्रमाणांत मिळविण्याचा प्रयत्न झाल्यास खात्रीनें त्या बँकेस कमी व्याजाच्या दरानें कर्जें देतां येतील व व्यापारास एक प्रकारें मदत होईल.

या बिलामध्यें एखादें कलम घालून डायरेक्टरांच्या जबाबदाऱ्या त्यांना समजाऊन दिल्या गेल्या असत्या व त्यांची शैक्षणिक व व्यावहारिक कुवतीची एखादी मर्यादा त्यांच्या जागेला घातली गेली असती तर पुष्कळ बरें झालें असते; तसेंच लिक्विडेशनच्या बाबतींतही निराळ्या बोर्डाची स्थापना झाली असती तर ठीक झालें असते.

या बिलामध्यें ठेवीदारांचें जास्तींत जास्त हित पाहिलें गेलें आहे. पण बँकिंगच्या व्यवहाराकडे देशाची सेवा या दृष्टीनें पाहिले म्हणजे, व लोक जसजसे या शास्त्रांत पारंगत होत जातील तसतसे, या बिलाचीं कलमें सर्वसाधारणपणें जास्तींत जास्त फायदेशीर अशींच होतील यांत शंका नाहीं.

("व्यापार-उद्योग"मधील लेखांतील उतारा)

(समाप्त)

---

**हा हिशेब बरोबर आहे काय?**—गेलीं दोन वर्षे चाललेल्या चिनी यादवींत चिनी सरकारचे २६ लाख, ४१ हजार सैनिक ठार किंवा जायबंदी झाले अगर शत्रुपक्षाला मिळाले असा अंदाज चिनी कम्युनिस्ट पक्षानें प्रसिद्ध केला आहे. त्या पक्षाच्या माहितीप्रमाणें गेल्या वर्षाच्या चढाईत कम्युनिस्ट पक्षाच्या लष्करानें ९,३७५ चौरस मैल अधिक प्रदेशाचा ताबा घेतला असून आतां त्याच्या ताब्यांत १४ लाख, ७१ हजार, ८७५ चौरस मैल म्हणजे, चीनच्या क्षेत्रफळाच्या २४·५% मुलूख आहे. कम्युनिस्ट पक्षाच्या लष्कराची हानि गेल्या दोन वर्षांत ८ लाख, १० हजार सैनिक झाली, असाहि त्या पक्षाचा अंदाज आहे.

## १५ हजार कंपन्यांचें नियंत्रण

### ब्रिटिश कंपनी कायद्याचा इतिहास

ब्रिटनमधील १९४८ चा कंपनी कायदा अमलांत आल्यावर ह्या कायद्याच्या उत्क्रांतीची १०० वर्षें पुरीं होतील. ह्या कायद्या-मुळें १३ हजार सार्वजनिक कंपन्या आणि २ लाख खाजगी कंपन्या ह्यांच्या व्यवहारावर नियंत्रण रहाणार आहे. ह्या नव्या कायद्यांत ४६२ कलमें आणि १८ शेड्यूल्स आहेत. १८४४ च्या पहिल्या कायद्यांत ८० कलमें आणि १० शेड्यूल्स होतीं. ह्यावरून नवीन कायद्याची वाढती कक्षा आणि गुंतागुंत लक्षांत येते. भांड-वलाच्या मर्यादित जबाबदारीच्या कंपन्या निघण्यास इंग्लंडमध्यें १८५५ मध्यें सुरवात झाली. त्या सालाच्या कायद्यांत 'मर्यादित' असा शब्द कंपन्यांच्या नांवाच्या अखेर घालण्याची प्रथा प्रथम घातली गेली. १८४४ चा पहिला व दुसरा आणि १८५५ चा कायदा ह्या तीन कायद्यांनीं मिळून ब्रिटनमधील कंपनी कायद्याचा पाया घातला गेला. १८४४ च्या दुसऱ्या कायद्यानें सहापेक्षा अधिक माणसांनीं लिमिटेड करून घेतल्या-शिवाय बँकिंगचा धंदा करण्यास बंदी घालण्यांत आली. १८५६ च्या कायद्यानें मर्यादित व अमर्यादित, दोन्ही प्रकारच्या जबाबदाऱ्यांची सोय केली. १८७० पूर्वी खाजगी अगर कौटुंबिक स्वरूपाच्या कंपन्या क्वचितच राजिस्टर केल्या जात पण हळू हळू ही संख्या वाढूं लागली आणि दर आठवड्यास कांहीं खाजगी धंद्यांचें कंपन्यांत रूपांतर होऊं लागलें. १९०७ च्या कंपनी कायद्यांत खाजगी कंपन्यांना मंजुरी देण्यांत आली. अशा कंप-न्यांना १९०० सालच्या कंपनी कायद्यांतील बऱ्याच महत्त्वाच्या कायदेशीर बंधनांतून मुक्त करण्यांत आलें.

कंपन्यांचा कारभार आणि कायदा ह्यांचा व्यावहारिक अनुभव लक्षांत घेऊन १८६२ ते १९०८ पर्यंतच्या कालांत १७ दुरुस्तीचीं बिलें करावीं लागलीं. १९०८ चा दुरुस्त कायदा हा तेव्हांपासून कंपनी कायद्याचा पाया होऊन बसला आहे. त्या कायद्यांत २९६ कलमें आणि ६ शेड्यूल्स आहेत. त्यांतच कंपनीच्या व्यवस्थे-संबंधींचें "ए" शेड्यूल आहे. १९४७ चा दुरुस्त कायदा १९२९ च्या कायद्याच्या जागीं आतां आला आहे. हा कायदा १९२८ चा कायदा दुरुस्त करून तयार केलेला होता. कंपनी कायद्याची दुरुस्ती करण्यापूर्वी दरवेळीं एका बोर्ड ऑफ ट्रेड कमिटीकडून चौकशी करविण्यांत आलेली आहे.

### १९४७ च्या कायद्यानें केलेले मुख्य फरक

कंपनीच्या हिशेबाची माहिती अधिक विस्तारानें देण्याची सोय १९४७ च्या कायद्यांत करण्यांत आलेली आहे. नफा-तोटा पत्रक अधिक तपशीलवार दाखविण्याची सक्ती करण्यांत आलेली आहे. होल्डिंग कंपनी आणि तिच्या अंगभूत कंपन्या ह्यांचे हिशेब वेगळ्या गटांत दाखविले जाणार आहेत. खाजगी कंपनीला जे कागदपत्र दरवर्षी नोंदावे लागतात त्यांत ताळेबंद असला पाहिजे असें कलम घालण्यांत आलें आहे. कंपनीच्या डायरेक्टरांना मिळणाऱ्या एकूण तनख्याची माहिती दिली जावी असें एक कलम आहे. कांहीं अपवाद वगळून डायरेक्टरांची वयोमर्यादा ७० पर्यंत ठेविली आहे. कंपनीच्या ऑडिटरची लायकी व दर्जा कांहीं विशिष्ट हिशेब-तपासनिसांच्या संस्थांनीं मान्य केलेला असला पाहिजे असें बंधन घालण्यांत आलें आहे.

वार्षिक साधारण सभेची नोटिस ७ च्या ऐवजी २१ दिवस दिली पाहिजे. खास ठराव मंजूर करण्याच्या सभेचीही नोटिस २१ दिवसांची पाहिजे. एकूण मतांच्या १/१० मतें धारण करणारे सभासद किंवा ज्या सभासदांनीं सरासरी निदान १०० पौंड तरी रक्कम आपल्या भागावर दिली आहे, अशा १०० सभासदांना कंपनीची सभा बोलावण्याचा हक्क आहे. एकाच वर्गांतील विक्रीला काढलेल्या भागांचे जेव्हां संपूर्णपणें पैसे दिलेले असतील त्यावेळीं भागावर नंबर घालण्याची जरूरी ठेवलेली नाहीं. कंपनीचा ऑफिसर ह्या शब्दांत डायरेक्टर, मॅनेजर अगर सेक्रेटरी ह्यांचा समावेश करण्यांत आलेला आहे. कंपनीला सेक्रेटरी असलाच पाहिजे, ही आतांची तरतूद १९२९ च्या कायद्यांत नव्हती. एखाद्या खाजगी कंपनीच्या एकुलत्या एक डायरेक्टरलाच तिचा सेक्रेटरी होता येणार नाहीं. प्रॉस्पेक्टसमधील मजकुराविषयीं बऱ्याच दुरुस्त्या करण्यांत आल्या आहेत. प्रॉस्पे-क्टसमधील कंपनीच्या नफ्यासंबंधींचा ऑडिटरचा अहवाल तीन वर्षांऐवजी पांच वर्षांच्या काळाचा असला पाहिजे. सभासदांच्या रजिस्टरमध्यें डायरेक्टरांच्या वयाची माहिती दिलेली असली पा-हिजे. त्याचप्रमाणें, डायरेक्टरांच्या भागांसंबंधीं जो व्यवहार असेल त्याचीही माहिती त्यास असली पाहिजे.

---

## प्रां. को. कौन्सिलची घटना

### सरैय्या कमिटीच्या शिफारसींची अंमलबजावणी

सरैय्या कमिटीची शिफारस मान्य करून मुंबई सरकारनें एक स्वतंत्र प्रांतिक सहकारी कौन्सिल नेमलें आहे. सहकारी प्रगतीबाबत चर्चा करून योजना आंखणें आणि सहकारी चळवळीबाबत सरकारास सल्ला देणें, हीं कामें कौन्सिलकडे सोंपविलेलीं आहेत. कौन्सिलची घटना खालीलप्रमाणें आहे:—

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटच्या कार्यकारी समितीचे सर्व सभासद, चार प्रांतिक सहकारी संस्थांचे (बँक, मार्केटिंग सोसायटी, इन्शुअरन्स सोसायटी व लँड मार्गेज बँक) प्रत्येकीं एक प्रमाणें चार प्रतिनिधी, मुं. प्रां. इं. को. असोसिएशनचा एक प्रतिनिधि, हौसिंग सोसायट्यांचा एक प्रतिनिधि, मुंबई लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे तीन सभासद (श्री. श्रीकांत, गुजरात; श्री. व्ही. पी. पवार, मध्यभाग; श्री. एस. आर. कांती, कर्नाटक), मुंबई लेजिस्ले-टिव्ह कौन्सिलचा एक सभासद (श्री. एस. डी. पाटील), एक अर्थशास्त्रज्ञ (प्रो. सी. एन. वकील), व्हिलेज इंडस्ट्रीज कमिटीचा चेअरमन, रेव्हेन्यु खात्याचा सेक्रेटरी, फिनॅन्स खात्याचा सेक्रेटरी, शेतकी खात्याचा सेक्रेटरी, सहकारी रजिस्ट्रार व जाइंट रजिस्ट्रार फॉर इं. को. अँड व्हि. इं.

इन्स्टिट्यूटचा चेअरमन हाच कौन्सिलचा चेअरमन राहील व सहकारी रजिस्ट्रारकडे सेक्रेटरीचें काम येईल.

---

**धान्य लागवडीसाठी मदत**—हिंद सरकारच्या शेतकी खात्यानें संयुक्त प्रांत सरकारला ११ लाख, ४६ हजार, २५० रुपये आणि मुंबई सरकारला सुमारें ६९ लाख रुपये मदत, अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमांसाठी मंजूर केली आहे. ही मदत १९४८–४९ ह्या वर्षासाठी असून खर्चाची वांटणी हिंद सरकार व प्रांतिक सरकारें ह्यांच्यांत निम्मेनिम होणार आहे. मुंबई सरकारला दिलेल्या मदतीपैकी २३ लाख, ९२ हजार रु. इतकी रक्कम लहान लहान पाटबंधाऱ्यांसाठी खर्च व्हावयाची आहे. २२ लाख, ४३ हजार रक्कम खतासाठी खर्च करण्यांत येणार आहे. एकूण २८ योजना दृष्टिपथांत आहेत. मुंबई व कर्नाटक भागांतील कोरडवाहू जमिनींना बियांचा पुरवठा करण्यासाठी ६ लाख रुपये खर्च व्हावयांचे आहेत.

## टाटा आयर्न ॲन्ड स्टील कं. लि.

### ३१ मार्च, १९४८ अखेरचा ताजा अहवाल.

टाटा कंपनीचा ताळेबंद ५५ कोटी, ७२ लक्ष रुपयांचा आहे. त्यापैकी १० कोटी, ४७ लक्ष रुपये शेअर भांडवल आहे. ७ कोटी, ४५ लक्षांचा रिझर्व्ह फंड व २२ कोटी, ६२ लाखांचा घसारा फंड आहे. सिंकिंग फंडांत १ कोटी, २२ लक्ष रु. आहेत. २ कोटी, १५ लक्ष रुपयांचीं तारणावरील कर्जें आहेत व २७ लाखांच्या मुदती ठेवी आहेत.

नफा-तोटा पत्रकाची बेरीज २७ कोटी, ८३ लक्ष रु. आहे. कंपनीनें १९ कोटी रुपयांची विक्री केली व शिल्लक कच्चा-पक्का माल ७ कोटी, २० लक्ष रुपयांचा आहे. मॅनेजिंग एजंटांना २८ लक्ष, ९४ हजार रु. कमिशन मिळालें आहे. एकूण नफा ३,३३,०६, ०११ रु. झाला आहे. त्यांतून घसाऱ्यासाठी १,५०,००,००० रु. काढले व सुमारें ५५ लक्ष रु. बोनसचे वजा केले, म्हणजे नफा-वाटणीस १,५८,५४,८२२ रु. उरतात.

कंपनीचा उत्पादन खर्च, मुख्यत्वें मजुरींतील वाढीमुळें, वाढत आहे आणि कंपनीच्या मालाच्या किंमतीचा प्रश्न आतां टारिफ बोर्डाकडे सोंपविण्यांत आला आहे. कंपनीचें सर्व प्रकारचें उत्पादन अहवालाचे सालीं घटलें.

कंपनी ३७ शाळा स्वतः चालवीत आहे व ३४ शाळांना मदत देत आहे. त्या दोन्हींत मिळून २१,४५८ विद्यार्थी आहेत. शाळांवरील खर्चासाठी कंपनीच्या चालू वर्षाच्या अंदाजपत्रकांत ९ लक्ष, ८५ हजार रुपयांची तरतूद आहे. वाढते खर्च व उतरता नफा ह्यामुळें शिक्षणावरील खर्चाचा बोजा कंपनीस जाणवत आहे. कामगारांना नफ्याच्या २२½% इतकी रक्कम बोनस म्हणून देण्यांत आली. त्या रकमेच्या २५% रक्कम प्रॉव्हिडंट फंडाकडे युनियनशीं ठरल्याप्रमाणें वर्ग करण्यांत आली. त्याखेरीज, अर्ध्या महिन्याचा पगार स्वातंत्र्य बोनस म्हणून देण्यांत आला.

## टाटा कंपनीनें सरकारला दिलेली रक्कम

### कर, एक्साइज ड्यूटी, आयात कर, रेल्वे भाडें, इ.

( आकडे लक्ष रुपयांचे आहेत )

| वर्ष | प्राप्तिवरील कर | एक्साइज ड्यूटी | आयात कर | रेल्वे भाडें | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १९३५–३६ | ४ | ३५ | ५ | १५९ | ४ | २०७ |
| १९३६–३७ | ३५ | ३४ | ४ | १५६ | ४ | २३३ |
| १९३७–३८ | ३६ | ३५ | ५ | १६६ | ६ | २४९ |
| १९३८–३९ | ६४ | ३८ | ११ | १८० | ६ | २९९ |
| १९३९–४० | ८२ | ४१ | ९ | २३४ | ६ | ३७३ |
| १९४०–४१ | ११५ | ४४ | १९ | २३० | ९ | ४१७ |
| १९४१–४२ | २६४ | ४३ | १६ | १९० | ९ | ५२२ |
| १९४२–४३ | ४२५ | ४० | ७ | १९७ | १० | ६७९ |
| १९४३–४४ | २४८ | ४४ | ४ | २०२ | १० | ५३४ |
| १९४४–४५ | ३८३ | ३८ | ६ | २०० | २४ | ६५१ |
| १९४५–४६ | ४११ | ४१ | १४ | १४० | ४१ | ६४७ |
| १९४६–४७ | ३११ | ४१ | ८ | २५७ | ४४ | ६६१ |
| १९४७–४८ | २११ | ३६ | ११ | २४९ | ३८ | ५४७ |

**कामगारांना नफ्यांत वाटा**—कांहीं निवडक धंद्यांत कांहीं काळापुरता कामगारांना नफ्यांत वाटा देण्याचा प्रयोग करून पहावा, असें मत ह्यासंबंधीं नेमलेल्या हिंद सरकारच्या कमिटीनें व्यक्त केलें आहे. प्रत्यक्ष व्यवहारांत काय प्रश्न उत्पन्न होतात ते समजून घेऊन त्यांचा अभ्यास करण्याची संधी मिळावी म्हणून वरील शिफारस करण्यांत आली आहे.

### श्री. के. वि. केळकर ह्यांचा सत्कार

भारत इंडस्ट्रिअल बँक लि. चे प्रारंभीपासूनचे अध्यक्ष श्री. केशव विनायक केळकर, एम्. ए; एलूएल्. बी; ह्यांच्या षष्ट्यब्दिपूर्तीनिमित्त बँकेच्या बोर्डानें रविवार ता. ८ रोजीं सत्कार समारंभ घडवून आणला. अध्यक्षस्थानीं बँकेचे डायरेक्टर श्री. के. पां. जोशी हे होते. त्यांच्या हस्तें श्री. केळकर ह्यांना कॅश बॉक्स नजर करण्यांत आली.

### इन्स्टिट्यूटचे नवे तात्पुरते पदाधिकारी

प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटचे चेअरमन, सर जनार्दन मदन हे सौराष्ट्रांत कामगिरीवर गेले असल्यानें त्यांचे गैरहजेरींत प्रिं. द. गो. कर्वे हे त्यांचें काम आतां पहाणार आहेत, असें समजतें. त्याचप्रमाणें, इन्स्टिट्यूटचे ऑ. सेक्रेटरी श्री. वा. पुं. वर्दे ह्यांच्या गैरहजेरींत प्रां. स. विमा सोसायटीचे मॅनेजर, श्री. ठाकोर हे त्यांचें काम पहातील. इन्स्टिट्यूटचे सुपरिंटेंडेंट, श्री. आर. एम. तळपदे हे रजा घेऊन मध्यवर्ती सरकारच्या 'निर्वासित' खात्यांत सहकारी संघटनेच्या सहाय्यार्थ गेले आहेत. त्यांचें काम श्री. व्ही. व्ही. बापट ह्यांचेकडे आलें आहे.


प्रगतीचा पुढील टप्पा

आयुष्याचें (१९१८) **विमा काम** आगीचें (१९४८)

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीजच्या विद्यमानें विमा-महर्षि श्री. अण्णासाहेब चिरमुले यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या विमा-परिषदेनें केलेल्या पुरस्कारानुसार महाराष्ट्राचें आधुनिक, आर्थिक व व्यापारी जीवन परिपूर्ण करण्याकरितां

स्वातंत्र्य-प्राप्तीच्या पहिल्या शुभ-वर्षदिनीं

१५ ऑगस्ट १९४८

**कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कं. लि., पुणें**

आगीच्या विमा-कामास सुरवात करीत आहे.

विशेष माहितीकरितां लिहा :

श्री. म. जोशी,
मॅनेजिंग डायरेक्टर.

# वि ज य
# टेक्सटाइल्स लि.

—येरंडवणा, पुणें ४—

आमची गेल्या वर्षांतील सर्वांगिण प्रगति आमच्या भागीदारांस व हितचिंतकांस निश्चित समाधानकारक वाटेल.

शेअर्स व ठेवी ह्याबद्दल पत्रव्यवहार करावा.

मॅनेजिंग एजंटस्.

# दि बॉंबे प्रॉव्हिन्शिअल को. बँक लि.

हेड ऑफिसः—९, बेक हाऊस लेन, कोट, मुंबई

स्थापना : १९११

चेअरमनः—श्री. रमणलाल जी. सरय्या, ओ. बी. ई.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | ... ... | २०,३३,००० रु. |
| गंगाजळी | ... ... | २७,१२,००० रु. |
| एकूण ठेवी | ... ... | ६,४१,३४,००० रु. |
| खेळतें भांडवल | ... ... | ७,७७,३३,००० रु. |

११ जिल्ह्यांत मिळून ५१ शाखा.

मुंबई प्रांतांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली बँक.

★ हिंदुस्थानांतील महत्त्वाच्या कित्येक शहरांतील बँकांशीं वसुलीची व्यवस्था केली आहे.

★ वेगवेगळया प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

—अटीसाठीं चौकशी करावी—

वा. पुं. वर्दे

ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

नवीन पुष्कळ निघाले, तरी

# तुळजाराम मोदी, सातारा

ह्यांचें पुढारीपण कायम आहे.


'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार


दि
# बँक ऑफ इंडिया, लि.

स्थापना १९०६

| | |
|---|---|
| खपलेलें भांडवल :— | ३,००,००,०००. |
| वसूल झालेलें भांडवल :— | १,५०,००,०००. |
| राखीव फंड :— | २,००,००,०००. |

मुख्य कचेरीः—ओरिएंटल बिल्डिंग्ज, मुंबई.

इतर शाखा :— मुंबईः— बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबा देवी व मलबार हिल. मुंबई नजीकः—वांद्रें व अंधेरी. अहमदाबादः—भद्र (मुख्य शाखा), गांधी रोड, इलिस ब्रिज, माणिक चौक व स्टेशन शाखा. कलकत्ता :— क्लाइव्ह स्ट्रीट ( मुख्य शाखा ), बडा बाजार व चौरंघी स्केअर. नागपूरः—किंग्ज वे व इतवारी बाजार. पुणेंः— लष्कर व शहर. मद्रास, कोईमतूर, कालिकत, अमृतसर, भुज ( कच्छ ), जमशेटपूर, जुनागड, कराची, पालनपूर, राजकोट, सुरत, सोलापूर, वेरावल.

लंडन शाखा :— १७ मूरगेट, लंडन ई. सी. २.

न्यूयॉर्क एजंट्स :—दि चेस नॅशनल बँक ऑफ दि सिटी ऑफ न्यूयॉर्क.

डायरेक्टर्स :—सर कासवजी जहांगीर, बॅरोनेट, जी. बी. इ., के. सी. आय. इ. चेअरमन; श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाइट, मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण, ना. सर शांतिदास अस्करन, नाइट, मि. महंमद सुलेमान कासम मिठा, सर किकाभाई प्रेमचंद, नाइट, श्री. भगवानदास सी. मेहता, श्री. कृष्णराज एम. डी. ठाकरसी.

चालू ठेवीचें खातें:—कांहीं ठिकाणें सोडून रोजच्या रु. ३०० ते रु १ लक्ष पर्यंतच्या शिलकेवर दरसाल द. शें. एकचतुर्थांश रु. व्याज देण्यांत येतें. रु. १ लाखाहून जास्त शिलकेवर खास योजनेनें व्याज दिलें जातें. सहामाही व्याज रु. ५ पेक्षा कमी झाल्यास तें दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग्ज बँक ठेवी योग्य अटीवर स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें. विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्युटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

बी. एन्. अटल, एजंट, पुणें


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व
प्रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२२ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.